महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २१

# महाराजा सयाजीराव आणि इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह

## देवदत्त कदम



महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : २१

# महाराजा सयाजीराव
# आणि
# इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव आणि
इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ४१
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम,
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
मो. नं. :- ८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ५५ रुपये

---

- मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
  संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
- या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
  कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
- **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/ 101507596(1) - 14-02-2019**
- **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/ 1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.


**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**


●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह

‘स्त्री हे जातिव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे’ असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत. कारण जातिव्यवस्था टिकवून ठेवण्याची जबाबदारी या व्यवस्थेने स्त्रीवर सोपवली होती. ज्याप्रमाणे ‘कर्म आणि पुनर्जन्म’ हा सिद्धांत जातिव्यवस्थेतील गुलामगिरी विनातक्रार स्वीकारण्यासाठी विकसित केला गेला त्याचप्रमाणे स्त्रीला समाजाच्या नैतिकतेचे संवर्धन करण्याची एकतर्फी जबाबदारीसुद्धा देण्यात आली. जातीअंताचा आग्रह धरणारे सर्वच समाजधुरीण आंतरजातीय विवाह हा जातीअंताचा सर्वात प्रभावी उपाय म्हणून सांगतात. आधुनिक भारतात भारतीय परंपरेला जे प्रमुख धक्के बसले ते मुख्यतः धर्म आणि जात सुधारणांच्या क्षेत्रातले होते. मिशनऱ्यांचे धर्मांतर, आधुनिक शिक्षणाचा प्रसार याबरोबरच पाश्चात्यिकरणाच्या प्रक्रियेमध्ये हिंदू समाजव्यवस्था ढवळून निघाली. फुलेंपासून क्रांतिकारक प्रबोधन पर्वास सुरुवात झाली. फुलेंची ही परंपरा सयाजीरावांनी विकसित केली. राजर्षी शाहूंनी सयाजीरावांच्या अनुकरणातून ती पुढे नेली.

१९८० नंतर भारतात स्त्रीवादी चळवळ विकसित झाली. परंतु ती विकसित होत असताना अभिनिवेश आणि परदेशी परंपरेची नक्कल यातच ती गुरफटली. परिणामी परिवर्तनापेक्षा प्रतिक्रियेतच तिची सर्व शक्ती 'वाया' गेली. १९९० नंतर स्त्री स्वातंत्र्याचे भारतीय 'नमुने' तिने आपलेसे करण्याचा प्रयत्न केला. आंतरजातीय विवाहाची चळवळ एक पुरोगामी चळवळ म्हणून प्रतिष्ठित झाली. याच दरम्यान शाहू महाराजांच्या प्रयत्नाने परंतु शाहूंच्या मृत्यूनंतर १९२४ मध्ये शाहू महाराजांच्या जनक घराण्यातील चुलत बहिणीचा इंदूरचे राजे तुकोजीराव होळकर यांचा मुलगा यशवंतराव याच्याशी झालेल्या आंतरजातीय विवाहाची चर्चा पुरोगामी चळवळीने फारच जोरात केली. परंतु इतिहास तोडून आणि उथळपणे अभ्यासण्याच्या आपल्या 'आवडत्या' छंदामुळे या विवाहाची प्रेरणा असणारा बडोद्याचा विवाह पुरोगामी चळवळीला माहीतसुद्धा नाही. इंदिराराजेंचा हा विवाह बडोद्यातील स्त्री उन्नतीच्या क्रांतीकार्याशी 'जोडून' अभ्यासल्याशिवाय त्याचे वेगळेपण आणि ऐतिहासिकता समजणार नाही.

महात्मा फुलेंना आपण भारतीय स्त्रीमुक्तीचे प्रणेते मानतो. महात्मा फुले स्त्रियांच्या उन्नतीसाठी लेखणी आणि कृतीद्वारे झगडले. परंतु फुलेंनी तयार केलेली स्त्री उन्नतीची 'पायवाट' सयाजीरावांनी 'एक्सप्रेस वे'मध्ये रूपांतरित केली याची पुसटशी

कल्पनासुद्धा महाराष्ट्रातीलच काय भारतातील स्त्रीमुक्ती चळवळीलासुद्धा नाही. परिणामी स्त्रीशिक्षण असो, स्त्री उद्योग असो किंवा हिंदू कोड बिलासह हिंदू स्त्रियांच्या बाजूचे कायदे असोत, भारताला मानदंड ठरणारे स्त्री उन्नतीचे 'सयाजी मॉडेल' आपल्या समतावादी आंदोलनांच्या 'परिघाबाहेर' राहिले.

## स्त्री उन्नतीचे 'सयाजी मॉडेल'

१८९१ मध्ये अस्पृश्य मुलींसाठी स्वतंत्र शाळेची स्थापना करून शाळेच्या प्रमुखपदी अस्पृश्य महिलेची नियुक्ती केली. १८९३ मध्ये अमरेली तालुक्यातील १० गावांमध्ये सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षण कायद्याची प्रायोगिक तत्त्वावर अंमलबजावणी केली. १८९३ मध्ये शाळेच्या एका मैलाच्या परिघात राहणाऱ्या ७ ते १० वर्षे या दरम्यानच्या सर्व मुलींना शाळेत येणे सक्तीचे करण्यात आले. जानेवारी १८९३ मध्ये भिल्ल, कोळी इ. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळांची स्थापना करून या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक साहित्याबरोबरच भोजनाची मोफत व्यवस्था करण्याचा आदेश सयाजीराव महाराजांनी दिला.

सयाजीरावांनी आदिवासी मुलींसाठी सोनगड येथे १८९६ ला पहिली मोफत निवासी शाळा सुरू केली. महाराजांनी १९०६ मध्ये संपूर्ण बडोदा संस्थानात सर्व जाती-धर्मांच्या मुलामुलींसाठी मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण कायदा लागू केला. असा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान आहे.

बालविवाह प्रतिबंधक कायदा मोडणाऱ्यांकडून घेण्यात येणारी दंड स्वरूपातील रक्कम प्राथमिक शाळेतील मुलींना शिष्यवृत्ती देण्यासाठी वापरली जाई.

मुलींच्या शाळांतील स्त्रीशिक्षिकांची गरज भागविण्यासाठी प्रशिक्षित स्त्रीशिक्षिका तयार करण्याच्या हेतूने १८८२ मध्ये फिमेल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना करण्यात आली. १९०९ साली या कॉलेजमध्ये बडोदा प्रांताबाहेरील विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र वसतिगृह स्थापन केले. १९३० मध्ये महाराजांनी या कॉलेजला ३०,००० रुपये निधी दिला होता. आजच्या रुपयाच्या मूल्यात ही रक्कम ७ कोटी ९७ लाख रुपयांहून अधिक भरते. भारतातील पहिल्या महिला शिक्षिकेचा मान असणाऱ्या सावित्रीबाईंना १८९० मध्ये महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर सयाजीरावांनी महिन्याला ५० रु. पेन्शन सुरू केली. फुल्यांचे दत्तक पुत्र यशवंत महाराजांच्या या मदतीमुळेच डॉक्टर होऊ शकले.

१९०७ साली महिला ग्रंथालय स्थापन करून महिला ग्रंथपालाची नेमणूक करण्यात आली. हा संपूर्ण भारतातील पहिला प्रयोग होता. आपल्या प्रजेला सर्व क्षेत्रातील शिक्षण देण्याच्या हेतूने सयाजीरावांनी १८८६ साली उस्ताद मौलाबक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली बडोद्यात म्युझिक स्कूलची स्थापना केली. फिमेल ट्रेनिंग कॉलेज, शहरातील गर्ल्स स्कूल तसेच नवसारी आणि पाटण येथील गर्ल्स स्कूलमधील मुलींसाठी स्वतंत्र म्युझिक स्कूल चालविले जात होते. सामाजिक क्षेत्रातील

कार्याबाबत जागरूक व सजग नागरिक तयार करण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी दिलेल्या १६ एप्रिल १९३५ च्या आदेशानुसार बडोद्यात गर्ल्स गाईडची चळवळ सुरू केली. बडोद्याच्या फिमेल ट्रेनिंग कॉलेजमध्ये गर्ल्स गाईडची संकल्पना सर्वप्रथम राबवण्यात आली.

जेव्हा पुरुषांना शिक्षणासाठी परदेशात पाठवण्याची बाब दुर्मिळ होती तेव्हा सयाजीरावांनी महिलांना शिक्षण घेण्यासाठी परदेशात पाठविले. सयाजीरावांनी मिस राधाबाई पोवार यांना अध्यापनशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठी १९१४-१५ मध्ये अमेरिकेच्या टीचर्स कॉलेजमध्ये पाठविले व दोन वर्षासाठी वार्षिक १५० रु. वेतन दिले. १९१७-१८ मध्ये स्नेहलता पगार यांना बालसंगोपनशास्त्रातील उच्च शिक्षणासाठी सरकारी खर्चाने अमेरिकेला पाठविण्यात आले. टी. सी. गजदार यांना ‘बालवाडी व बालमानसशास्त्र’ या विषयाच्या उच्च शिक्षणासाठी लंडनला पाठविले. भारताच्या सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या हंसा मेहता यांनाही उच्च शिक्षणासाठी सयाजीरावांनी आर्थिक मदत केली होती.

## महाराणी चिमणाबाई : स्त्री कर्तृत्त्वाचा ‘परमोच्च’ विकास

स्त्रीशिक्षणाच्या दिशेने वाटचाल करताना सयाजीरावांनी महाराणी चिमणाबाईंपासून सुरुवात केली. विवाहापर्यंत निरक्षर असणाऱ्या चिमणाबाईंना शिक्षण देऊन सयाजीरावांनी त्यांच्यातील परिपूर्ण स्त्री घडवली. महाराजांच्या ‘वाटेने’

मार्गक्रमण करत स्त्री-उन्नतीसाठी कार्यरत राहिलेल्या महाराणी चिमणाबाईंना ३ ऑगस्ट १८९२ ला ब्रिटिश महाराणींनी 'Emperial Order of the Crown of India' या किताबाने सन्मानित केले. १९०६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय कॉंग्रेसच्या दुसऱ्या हिंदी औद्योगिक परिषदेतील महिला विभागाच्या अध्यक्षा म्हणून चिमणाबाईंची निवड करण्यात आली होती. याच अधिवेशनाच्या सर्वसाधारण विभागाचे अध्यक्ष सयाजीराव महाराज होते. राजा आणि राणी पती-पत्नींना एकाच वेळी एखाद्या महत्त्वाच्या राष्ट्रीय परिषदेचे अध्यक्षपद सन्मानाने मिळण्याचा भारतातील हा एकमेव प्रसंग असावा. महाराणी चिमणाबाई या पडदा पद्धतीचा त्याग करणाऱ्या भारतातील बहुधा पहिल्या राणी आहेत.

१९११ मध्ये महाराणी चिमणाबाईंनी भारतीय स्त्रियांच्या स्थितीची जगातील ७ खंडातील २९ देशांमधील स्त्रियांच्या स्थितीशी तुलना करणारा 'The Position of Women in Indian Life' हा महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिला. अशा पद्धतीने लिहिलेला जगातील हा आजअखेरचा एकमेव ग्रंथ आहे. चिमणाबाईंनी हा ग्रंथ भारतीय स्त्रियांना अर्पण केला असून तो लंडनमधून प्रकाशित झाला होता. हा ग्रंथ म्हणजे महाराजांच्या प्रेरणेने विकसित झालेल्या चिमणाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचा परमोच्च बिंदू होता.

## स्त्रियांचा उत्कर्ष : बडोद्यातील उपक्रम

स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी सयाजीरावांनी महाराणी चिमणाबाईंच्या नेतृत्वाखाली बडोद्यात विविध संस्था सुरू केल्या. स्त्रियांचा सामाजिक संपर्क वाढावा यासाठी ३ मार्च १९०३ रोजी 'चिमणाबाई लेडीज क्लब'ची स्थापना करण्यात आली. अशा प्रकारचा भारतातील हा पहिला क्लब होता. या क्लबच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील बुद्धिमान स्त्रियांमध्ये होणारा परस्पर संवाद हा बडोद्यातील स्त्रीशिक्षणाच्या प्रगतीचा महत्त्वाचा टप्पा होता. मध्यमवर्गीय कुटुंबातील स्त्रियांचा दृष्टिकोन व्यापक व्हावा, त्यांचा सामाजिक अवकाश विस्तारून त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची जडणघडण व्हावी या उद्देशाने २० फेब्रुवारी १९१५ ला 'श्री महाराणी चिमणाबाई स्त्री समाजा'ची स्थापना करण्यात आली. श्री. मनोरमा दिघे यांच्या नेतृत्वाखाली १९१५ साली जुम्मादादा व्यायाम मंदिरात 'कन्या आरोग्य मंदिरा'ची स्थापना करण्यात आली. महिलांसाठी स्वतंत्र व्यायामशाळा सुरू करणारे भारतातील पहिले बडोदा संस्थान सयाजीरावांच्या आधुनिक विचारांची साक्ष देते.

स्त्रियांना स्वावलंबी व त्यांचा व्यावसायिक दृष्टिकोन व्यापक करण्यासाठी १९१७ मध्ये 'स्त्री उद्योगालया'ची स्थापना करण्यात आली. या उद्योगालयाने महिलांविषयीचे विविध उद्योग आणि तांत्रिक शिक्षणाच्या विविध अभ्यासक्रमाची सोय करून दिली. आई व बालकाचे आरोग्य उत्तम असणे राष्ट्राच्या

विकासातील अत्यंत महत्त्वपूर्ण बाब असल्याने सयाजीरावांनी माता व बालकांच्या आरोग्यासाठी जे जे करता येईल ते सर्व केले. भारतातील पहिल्या 'बाल सप्ताह' आयोजनाचे श्रेय बडोदा संस्थानला जाते. १ ते ६ फेब्रुवारी १९२४ दरम्यान बडोद्यात आयोजित केलेल्या बाल सप्ताहामध्ये मातेचे आरोग्य व बालकांचे संगोपन या विषयाशी संबंधित निबंध स्पर्धा तसेच 'महिला आणि बालकल्याण' या विषयावरील पोस्टर प्रदर्शन भरविले होते.

आर्थिक सबलीकरणाबरोबर महिलांना काटकसरीची सवय लागून महिलांची उन्नती व्हावी यासाठी सयाजीरावांनी १९३१ मध्ये महिलांच्या काटकसर संस्थांची (म्हणजेच बचत गटांची) स्थापना केली. भारतातील बचत गट चळवळीचा हा आरंभ बिंदू होता. बांग्लादेशातील अर्थशास्त्रज्ञ आणि बचत गट चळवळीच्या कामाची दखल घेऊन २००६ मध्ये ज्यांना नोबेल पुरस्कार दिला गेला त्या महंमद युनूस यांनी त्यांच्या कामास सुरुवात करण्याअगोदर ५० वर्षे सयाजीरावांनी बडोद्यात हा प्रयोग यशस्वी केला होता.

महिलांनी आपल्या बंदिस्त जीवनक्रमातून थोडासा वेळ काढून करमणूक, व्यायाम आणि खेळ यात आपला वेळ घालवावा यासाठी १४ फेब्रुवारी १९३७ रोजी 'महिला क्रीडा मंडळ' सुरू करण्यात आले. या क्रीडा मंडळाच्या माध्यमातून स्त्रियांना योगा, लाठी, लेझीम यासारख्या मैदानी खेळांचे प्रशिक्षण दिले जात असे.

## बडोद्यातील स्त्रीविषयक ‘क्रांतिकारक’ कायदे

पारंपरिक समाजव्यवस्थेत रूढी-परंपरांनी जखडलेल्या स्त्रियांना सयाजीरावांनी कायदेशीर तरतुदींच्या माध्यमातून ‘मुक्ती’चा मार्ग दाखवला. भारतीय समाजपरंपरेने स्त्रियांना नाकारलेले अनेक अधिकार सयाजीरावांनी कायद्यांच्या माध्यमातून आपल्या संस्थानातील स्त्रियांना बहाल केले. भारतीय राज्यघटनेलाही स्त्रियांना जे कायदेशीर अधिकार बहाल करता आले नाहीत ते सयाजीरावांनी राज्यघटना लागू होण्याच्या अगोदर ४९ वर्षे बडोद्यातील स्त्रियांना दिले होते.

१९०१ मध्ये सयाजीरावांनी ब्रिटिश भारतातील विधवा विवाह कायद्याच्या धर्तीवर बडोद्यात विधवा पुनर्विवाहाचा कायदा लागू केला. पतीच्या मृत्यूनंतरही स्त्रियांना आपले जीवन सामान्य स्त्रीप्रमाणे जगता यावे हा या कायद्यापाठीमागचा मुख्य उद्देश होता. आजही उच्च जातींमध्ये विधवा पुनर्विवाहास विरोधाची भावना प्रबळ असून खुद्द स्त्रियाही बऱ्याचदा त्याला विरोध करतात. या पार्श्वभूमीवर १२० वर्षांपूर्वी १९०१ मध्ये बडोद्यात विधवा पुनर्विवाह कायदा लागू करणारे सयाजीराव महाराज ‘द्रष्टे’ प्रशासक ठरतात.

या संदर्भात बडोदा संस्थानात विधवांनी महाराजांकडे अर्ज करून पुनर्विवाहाची परवानगी मागितली होती. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे, “२९ सप्टेंबर १८८५ रोजी नौसारी येथील विधवांनी गायकवाड सरकारकडे अर्ज केला होता, त्यात २ विसालाड,

१ दशालाड व १ मोटवानी अशा चार विधवांनी पुनर्विवाहाची परवानगी मागितली होती. त्याचप्रमाणे डभईजवळच्या दशालाड वाणी जातीतील विधवांनीसुद्धा गायकवाड सरकारकडे अशाच प्रकारे अर्ज केला होता.” दुर्दैवाने या कायद्याचा फारसा लाभ घेण्यात आला नसला तरी महाराजांनी विधवा पुनर्विवाहाला शक्य तितका पाठिंबा दिला होता.

महाराजांचा धार्मिक आणि सामाजिक सुधारणेतील पुढाकार जगजाहीर आहे. धर्म असो किंवा जात महाराज या सुधारणांकडे सामाजिक दृष्टिकोनातून पाहात असत. या संदर्भात रियासतकार सरदेसाईंनी ‘श्री.सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत’ या त्यांच्या ग्रंथात नोंदवलेली आठवण महत्त्वपूर्ण आहे. या आठवणीतून एक बाब स्पष्ट होते की, महाराज फक्त कायदे करून थांबत नसत तर त्या अनुषंगाने आवश्यक कृतीची सुरुवात स्वत: पासून करत असत.

सरदेसाई लिहितात, “लोकहिताच्या बाबत दिसली की महाराज तिचा मोठ्या उत्कंठेने पुरस्कार करीत. सामाजिक बाबतींत तर ते अग्रगण्यच बनले. १९०८ साली ं गणेश सदाशिव भाटे नावाच्या एका विद्वान् तरुणास महाराजांनी नोकरीत घेतले. त्याची हुशारी व चलाखी विशेष कौतुकास्पद होती. नुकतेच ते इंग्लंडचा अभ्यासक्रम पुरा करून परत आले. तत्पूर्वी त्यांची पहिली तरुण बायको वारली आणि द्वितीय विवाहासाठी वीस वर्षांची एक विधवा बाई त्यांनी पसंत केली. भाट्यांचे वडील-मातुश्री

हयात होते. त्यांस हा पुत्राचा विचार पसंत नव्हता. विधवा बाईशी मुलाने पुनर्विवाह केला तर आपण त्याचे तोंड पाहाणार नाही, लग्न मोडून काढू; असा धाक त्यांनी मुलास घातला. भाटे कुटुंबाचा व माझा चांगला परिचय असून ही पुनर्विवाहाची अडचण सहजी बोलताना मी महाराजांच्या कानावर घातली. पुनर्विवाह लावण्यास पुरोहित कोणी पुढे होईनात.

बडोद्याच्या सनातनी मंडळींनी लग्नात विघ्न आणण्याचा चंग बांधला. महाराजांनी निश्चय केला कीं, सुधारणेची ही संधी सहज आली आहे तिचा उपयोग करून आपण त्यात यश मिळवावे. त्यांनी पदरच्या आश्रितांस कळविले, आपल्या राज्यांत विधवा-पुनर्विवाह रूढ करण्याची आवश्यकता आहे. महाराजांचा पाठिंबा मिळाल्यावर मग विरोधकांची डाळ काय शिजणार ! सरकारांतून सर्व साहित्य व मदत मिळाली. चिमणबागच्या वाड्याला लागून एक भला मोठा विस्तीर्ण मंडप सिध्द झाला. सरकारांतून तीन-चारशे मंडळींना आमंत्रणे गेली. मुंबई-पुण्याकडचे अनेक नामांकित पाहुणे बोलावण्यात आले. माघ मासात सकाळी आठपासून दहापावेतो एकंदर विवाहसमारंभ मोठ्या उत्साहाने पार पडला. महाराज स्वत: हजर राहिले. जिकडे तिकडे आनंदीआनंद पसरला. मुंबईचे बॅरिस्टर मुकुंदराव जयकर समारंभास हजर होते. त्यांचे सुंदर भाषण त्या वेळी लोकांना ऐकण्यास मिळाले. स्वत: महाराजही बोलले. नवरदेव भाटेही बोलले.

दोन प्रहरीं तीनशें पात्रांचे सुंदर पंक्तिभोजन ‘लक्ष्मी-विलास’ राजवाड्यात झाले. त्यास भाट्यांचे वडील हजर राहीनात. त्यांचा या उपक्रमास तीव्र विरोध होता. भोजनास हजर राहणार नाही, असा जबाब त्यांनी पाठविला. त्यावरून महाराजांनी मला त्यांच्याकडे पाठवून कळविल, ‘भोजन तुम्हास नको असेल तर करू नका, पण भोजनप्रसंगी महाराजांजवळ बसून गोष्टी बोलण्यास काय हरकत!’ मग ते पंक्तींत आले. महाराजांच्या बाजूस त्यांचा पाट मांडला. समोर मिठाईचे ताट ठेवले. त्यांनी पंक्तीत हिंडून आग्रह व विचारपूस केली. हा एकंदर प्रसंग इतका यशस्वी झाला की, विधवा-पुनर्विवाहाची पध्दत सहजी राज्यात दृढमूल झाली.” हा प्रसंग सयाजीरावांची कृतिशीलता अधोरेखित करतो.

१८८४ मध्ये महात्मा फुलेंनी मुंबई सरकारकडे बालविवाह प्रतिबंधक कायदा करून बालविवाह लावणाऱ्या दोन्ही पक्षातील पालकांकडून दंड वसूल करावा व तो दंड बहुजनांच्या शिक्षणासाठी खर्च करण्याची मागणी केली होती. विशेष बाब म्हणजे ही मागणी करत असतानाच अशा प्रकारचा कायदा करण्याची दृष्टी संपूर्ण भारतात फक्त सयाजीरावांकडे असल्याचे मत फुलेंनी नोंदवले होते. महात्मा फुलेंची ही अपेक्षा सत्यात उतरवत सयाजीरावांनी १९०४ मध्ये त्यांच्या मागणीला सुसंगत असा ‘बालविवाह प्रतिबंधक कायदा’ बडोद्यात लागू केला.

महात्मा फुलेंच्या मागणीच्या पुढे जाऊन सयाजीरावांनी वधू-वर पक्षाबरोबर बालविवाह लावणाऱ्या भटजीलासुद्धा दंड आणि शिक्षेची तरतूद या कायद्यात केली.

हिंदू कोड बिल हे स्वातंत्र्योत्तर भारतात भारतीय महिलांच्या उत्कर्षाचा महत्त्वपूर्ण मार्ग मानले गेले. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी संघर्षरत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखेरीस आपल्या कायदेमंत्रिपदाचा राजीनामा दिला हे आपण जाणतोच. परंतु भारतीय राज्यघटनेत या विषयाची चर्चा सुरू होण्याअगोदर ४५ वर्षे बडोद्यात हिंदू कोड बिलाची अंमलबजावणी सुरू झाली होती. हिंदू कोड बिलातील सर्व ६ कायदे सयाजीरावांनी १९०५ ते १९३३ दरम्यान बडोद्यात लागू केले. उर्वरित भारतातील हिंदू महिलांना जे हक्क मिळायला ६०-७० वर्षे संघर्ष करावा लागला ते हक्क बडोद्यातील स्त्रियांना उर्वरित भारतातील हिंदू स्त्रियांच्या अगोदर ११५ वर्षे मिळाले होते.

१९०५ मध्ये बडोद्यात हिंदू विवाह कायदा लागू करण्यात आला. या कायद्यात हिंदू लग्नाच्या मूलतत्त्वाची व्याख्या करून, कायदेशीर लग्नाच्या अवश्य गोष्टी, स्त्री-पुरुषांचे परस्पर हक्क, त्यांचे मिळकतीवरील अधिकार, एकमेकांबद्दलची जबाबदारी व लग्न संबंधाची अविछीन्नता या सर्व गोष्टी निश्चित करण्यात आल्या. हिंदू विवाह कायदा करणारे बडोदा हे ब्रिटिश भारत आणि ५६५ संस्थानातील पहिले संस्थान होते.

१९०८ मध्ये आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांना प्रोत्साहन देणारा विशेष विवाह कायदा सयाजीराव महाराजांनी बडोद्यात लागू केला. ब्रिटिश भारतात कोठेही असा कायदा अस्तित्वात नव्हता. अशा प्रकारचा कायदा करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये भारतात असा कायदा संमत करण्यात आला. त्याआधी ४६ वर्षांपासून बडोद्यात या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली होती.

ब्रिटिश भारतातील विवाह नोंदणी कायद्यानुसार आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्यांना आपण कोणत्याही मान्यताप्राप्त धर्माचे अनुयायी नाही असे घोषित करावे लागत होते. परंतु बडोदा कायद्यात अशी घोषणा आवश्यक नव्हती. आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या व्यक्तीला आपल्या इच्छेनुसार धर्माचरणाचे स्वातंत्र्य बडोद्याच्या या कायद्यात देण्यात आले होते. १९०८ ला हा कायदा करून सयाजीरावांनी लोकांना एक महत्त्वाचे स्वातंत्र्य बहाल केले. तसेच हा कायदा पास झाल्यानंतर ३२ वर्षांत फक्त ५० विवाह या कायद्यानुसार झाले. यामध्ये हिंदू आंतरजातीय विवाहाची ४७ प्रकरणे आहेत तर दोन हिंदू-पारसी व हिंदू-ख्रिश्चन व एक बौद्ध-ख्रिश्चन विवाह या कायद्याअंतर्गत झाले आहेत. यामध्ये जैन आणि मुस्लिम धर्मीयांमध्ये असा एकही विवाह झाला नाही.

पुढे पाच वर्षांनी १९१३ मध्ये जेव्हा महाराजांचीच कन्या इंदिराराजे या कायद्याला सुसंगत निर्णय घेऊ लागली तेव्हा प्रसंगी स्वतःचा मानमरातब बाजूला ठेवून मुलीच्या पाठीशी उभा राहत महाराजांनी आपली कृतिशीलता सिद्ध केली. महाराजांनी आपल्या कन्येला आपल्या जातीबाहेरील जोडीदाराबरोबर विवाह करण्यापासून रोखले नाही. हीच भूमिका महाराजांनी आपले नातू आणि उत्तराधिकारी प्रतापसिंह यांच्याबाबतही घेतली. प्रतापसिंह यांचे लग्न करण्याचा निर्णय झाल्यानंतर त्यांनाही महाराजांनी आपली सहचारिणी निवडण्याचे स्वातंत्र्य दिले होते. प्रतापसिंहांचा कोल्हापूर संस्थानातील हासुर येथील सरदार मानसिंगराव घोरपडे यांची कन्या शांतादेवी यांच्याशी १९२९ मध्ये झालेला विवाह ही बाब 'क्रियेविन वाचाळता व्यर्थ आहे' या उक्तीची प्रचिती देणारी आहे.

१९१७ मध्ये भारताच्या केंद्रीय कायदेमंडळात विठ्ठलभाई पटेल यांनी आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता मिळावी यासाठी एक बिल मांडले होते. हे बिल 'पटेल बिल' म्हणून देशभर गाजले. या बिलाला परंपरावादी हिंदू नेत्यांनी विरोध केला होता. तर राजर्षी शाहूंनी जाहीरपणे या बिलाला पाठिंबा दिला होता. या बिलाच्या पार्श्वभूमीवर पुढे १९१८ मध्ये शाहू महाराजांनी धनगर-मराठा विवाह घडवून आणण्यासाठी प्रयत्न

सुरू केले. हा इतिहास आपल्याला परिचित आहे. परंतु असाच कायदा पटेल बिल येण्याअगोदर १० वर्षे 'विशेष विवाह कायदा - १९०८' बडोद्यामध्ये लागू झाला होता हे आपल्याला माहीत नसते.

शाहू महाराजांनी घडवून आणलेल्या आंतरजातीय विवाहाला ज्याप्रमाणे पटेल बिलाची पार्श्वभूमी होती त्याचप्रमाणे बडोद्याच्या या संदर्भातील कायद्यांचाही भक्कम आधार होता हे शाहू महाराजांच्या पुढील पत्रावरून स्पष्ट होते. ३० जानेवारी १९१८ ला शाहू महाराजांनी बडोद्याच्या दिवाणांकडून सयाजीरावांनी लागू केलेल्या विवाह आणि जातीबाबत कायद्यांच्या पुस्तकांच्या काही प्रती मागवल्या होत्या. या संदर्भातील पत्रात शाहू महाराज म्हणतात, "I learn H.H. the Maharaja Saheb has made laws for Baroda Rajya to correct certain social abuses in matters of marriage, degrading caste customs & c. and that in the Penal Code also some changes have been made. I should very much like to see these laws and shall feel obliged if you can very kindly let me have copies containing them."

हे पत्र सयाजीरावांच्या कायद्यांची उपयुक्तता आणि ऐतिहासिकता अधोरेखित करते. बाबासाहेब सयाजीरावांवरील मृत्युलेखात म्हणाले होते की बडोद्याचे कायदे हे इंग्लंड-अमेरिकेपेक्षाही पुढारलेले आहेत. राजर्षी शाहूंचे वरील पत्र आणि

बाबासाहेबांचा अभिप्राय यांचे एकत्र वाचन केल्यास कोल्हापूर या प्रागतिक संस्थानाच्या सामाजिक धोरणांवरील बडोद्याचा प्रभाव स्पष्ट होतो. इतकेच नव्हे तर स्वतंत्र भारताच्या लोकशाही राज्यघटनेतील अनेक कलमेही बडोद्यातील कायद्यांशी सुसंगत आहेत. त्यामुळे स्वतंत्र भारतातील सामाजिक लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ म्हणूनसुद्धा सयाजीरावांचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

संस्थानात प्रसूतीवेळी होणारे मातांचे मृत्यू रोखणे, बाळाच्या जन्मावेळी दाई हजर असण्याचे महत्त्व लोकांना पटवून देणे आणि दाईप्रती असणारा निष्काळजीपणा व केले जाणारे दुर्लक्ष यावर मात करण्यासाठी सयाजीरावांनी १६ ऑक्टोबर १९१९ रोजी बडोद्यात 'दाई कायदा' लागू केला. या कायद्यानुसार परिचारिका प्रशिक्षण घेतल्याशिवाय कोणत्याही महिलेला सुईणीचे काम करण्यास बंदी घालण्यात आली. परिचारिका प्रशिक्षण पूर्ण करून एखाद्या रुग्णालयात कामाचा अनुभव घेतल्यानंतरच त्या स्त्रीला परिचारिकेचा परवाना दिला जात होता.

१९३१ मध्ये सयाजीरावांनी बडोद्यात हिंदू घटस्फोट कायदा लागू केला. कोर्टात नोंदणी केल्याशिवाय घटस्फोट मान्य केला जाणार नाही अशी तरतूद सयाजीरावांनी या कायद्यात केली. या कायद्यानुसार कोणत्याही स्त्रीच्या पतीचा मृत्यू होऊन ७ वर्षे झाली असतील, त्याने संन्यास घेतला असेल, धर्मांतर केले असेल किंवा तो नपुंसक असेल तर त्या स्त्रीला अशा लग्नातून घटस्फोट

मागण्याचा अधिकार देण्यात आला. या मुख्य कलमांबरोबरच पत्नीच्या व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाह आणि संगोपनाची व्यवस्था करण्याबद्दलचे नियमही या कायद्यात समाविष्ट करण्यात आले होते. पुढच्याच वर्षी १९३२ मध्ये महाराजांनी 'माता कल्याण कायदा' बडोद्यात अमलात आणला. १९२९ च्या 'बॉम्बे माता कल्याण कायद्या'च्या धर्तीवर हा कायदा करण्यात आला होता. कारखान्यात काम करणाऱ्या महिलांच्या प्रसूतीच्या काही काळ आधी व काही काळ नंतर कारखान्यातील त्यांच्या रोजगाराच्या नियमनाची आणि प्रसूतीदरम्यान त्यांना आर्थिक साहाय्य देण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली.

१९३३ मध्ये सयाजीराव महाराजांनी बडोद्यात 'हिंदू स्त्रियांचा संपत्तीतील हक्क कायदा' लागू केला. वारसा हक्काने हिंदू महिलांना संपत्तीत हिस्सा देणारा हा कायदा लागू करणारे बडोदा हे भारतातील पहिले संस्थान होते. मृत मुलींच्या मुलांना जिवंत मुलींबरोबर संपत्तीत वाटा देण्याची सयाजीरावांनी या कायद्यात केलेली तरतूद स्वतंत्र भारतात ७० वर्षांनंतरदेखील लागू होऊ शकली नाही यातून सयाजीरावांच्या या कायद्याचे क्रांतिकारकत्व सिद्ध होते.

स्त्री सक्षमीकरणासाठीच्या प्रयत्नांबरोबरच महाराजांनी सरकारी नोकरीत स्त्रियांना रुजू करून घेण्याचा हुकूम काढला. सयाजीरावांचा हा हुकूम म्हणजे संधी आणि शिस्त यांच्या मिलाफाचा उत्तम 'नमुना' आहे. हा आदेश पुढीलप्रमाणे -

सरकारी नोकरीत स्त्रियास दाखल करण्यास हरकत नाही. त्यांच्याशी सभ्यतेने वागावे.

ज्या जागी केवळ स्त्रीवर्गाकडून नोकरी घेतली पाहिजे, अशा जागांशिवाय करून बाकी सर्व ठिकाणी पुरुष वर्गाचे नोकर आहेत. तथापि त्यातील काही ठिकाणी स्त्रियांस नोकरीत घेण्यास हरकत आहे, असे नाही; परंतु एक महत्त्वाची गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे ती ही की, हल्लीची स्थिती ध्यानात घेतली तर केवळ शिक्षणात काही स्त्रिया पुढे आल्या. तेवढ्यावरूनच त्यास नोकरीत दाखल करता येईल, असे नाही. आपल्या समाजात स्त्री-पुरुषांची नीतिमत्ता जोरदार व भक्कम झाल्याशिवाय स्त्रियांस नोकरीत ठेविल्यापासून कित्येक प्रसंगी हानी होण्याचा संभव असतो, हे विसरून जाता कामा नये. शिवाय हल्लीचे स्त्रियांचे शिक्षण लक्षात घेता, त्यांच्या शिक्षणाविषयीचा अतिशयोक्तीचा ग्रह होण्याचा संभव आहे, हेही ध्यानात ठेवावे. या व दुसऱ्याही गोष्टींचा विचार करता असे ठरविणे योग्य दिसते की, स्त्रियास नोकरीत दाखल करण्यात हरकत नाही, असे सामान्य धोरणावर लिहिले आहे.

तथापि, कारकुनाच्या दर्जाच्या नोकरीवर दाखल करण्याविषयी कोणी स्त्री अर्जदार आल्यास, त्या अर्जाविषयी दिवाणांकडून मंजुरी मिळवावी व त्याच्यावरील जागेसाठी कोणी स्त्री उमेदवार असेल तर खुद्द हुजूरची मंजुरी घ्यावी. मात्र पोलिस वगैरे ठिकाणी जेथे स्त्रियांकडून नोकरी होण्यासारखी नसेल, तेथे स्त्रियांस नेमू

नये हे उघड आहे. नोकरीत दाखल झालेल्या स्त्रियांचे कपडेलत्ते वगैरेंबद्दल पुढे-मागे काही नियम करण्याची आवश्यकता वाटली तर तसे नियम करवून घ्यावे. नियमाप्रमाणे स्त्री नोकरांनी चालले पाहिजे, हे उघड आहे. कचेरीत किंवा कामावर जाताना स्त्रियांचे कपडे साधे असून भपकेदार नसावेत. स्त्री नोकरांकडून काम घेण्यात ढिलाई चालवू नये किंवा असंतोषकारक काम निभावून घेऊ नये. त्यांच्याशी सर्वांनी सभ्यतेने व सरळ रीतीने वागणूक ठेवावी. कोणी स्त्री लेडी डॉक्टरच्या जागेवर नेमली जाईल, तर तिने डॉक्टरांचे सर्व काम करण्यास तयार असले पाहिजे, केवळ स्त्री रोग्यापुरतेच तिने काम करावयाचे आहे, असे समजू नये.'

स्त्री सक्षमीकरणाची चळवळ एका विशिष्ट टप्प्यावर आल्यावर महाराजांनी हा हुजूर हुकूम केला होता. या हुकुमाशी सुसंगत असे विचार महाराजांनी १९ जानेवारी १९२४ रोजी बनारस हिंदू विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात मांडले होते. यावेळी बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलपती या नात्याने बोलताना महाराज म्हणतात, "आम्हाला बंधमुक्त का करीत नाही?" असा सवाल आज स्त्रीवर्ग तुमच्या बुद्धीला टाकीत आहे, तोच सवाल अधिक जोराने अस्पृश्यांचा वर्गही करीत आहे. निर्दय रूढीच्या लंगड्या आधारावर या शूद्रातिशूद्रांची किती मोडतोड आपण चालविली आहे, किती हतवीर्य आपण त्यांना करीत आहोत! आपल्या या कृत्याचे समर्थन करणे अशक्य आहे. या दुर्दैवी लोकांची दाद हिंदू महासभा लावू पाहत आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. या

पुढारलेल्या विद्यापीठाच्या मंडळींनाही माझी विनंती आहे की, जगातील इतर चार विद्वान मंडळीत तुमचा नावलौकिक राहावा. असे ज्याअर्थी तुम्हाला वाटत आहे त्याअर्थी कोणत्याही सच्छिल व सद्‌हेतुप्रेरित हिंदू माणसाला इथे येऊन आपल्या प्राचीन आचारविधीचे व धर्मग्रंथांचे अध्ययन करण्याला तुम्ही कसलीही आडकाठी ठेवू नये; हिंदू धर्मविद्या प्राप्त करून घेण्याच्या कामी लिंगभेद किंवा जातिभेद यांची हरकत मानू नये."

उक्ती आणि कृती यांचा मेळ असणारे समाजक्रांतिकारक आणि समाजसुधारक अपवादात्मक असतात. याबाबत भारतातील सर्वोत्तम आदर्श म्हणून महात्मा फुलेंकडे पाहिले जाते. परंतु फुले हे राज्यकर्ते नव्हते तर स्वतंत्रपणे काम करणारे समाजनेते होते. अशावेळी कोणतीही स्पष्ट भूमिका घेणे, वैयक्तिक पातळीवर कृतिशीलता जपणे तुलनेने सोपे असते. परंतु राज्यकर्ता आणि समाजक्रांतिकारक या दोन्हीही भूमिका एकाचवेळी पार पाडत असताना ही बाब अधिक आव्हानात्मक होते. उक्ती आणि कृती यांचा 'कमाल' मेळ घालण्यामध्ये फुलेंच्या नंतर सयाजीरावांचा नंबर लागतो. एक पारंपरिक राज्यकर्ता असूनही सयाजीरावांनी धोरण आणि कृती यांचा उत्तम मेळ घातल्याचे स्पष्ट आणि असंख्य दाखले मिळतात. सयाजीरावांची भाषणे 'आधी केले आणि मग सांगितले' या वर्गातील होती. १८८६ पासून स्त्रियांसाठीचे उपक्रम आणि कायदे या दृष्टीने सयाजीराव कृतिशील होते. या

कृतिशीलतेशी जोडून वरील भाषण विचारात घ्यावे लागते. त्याचप्रमाणे वरील भाषणानंतर महाराजांनी स्त्रियांना दिलेले पुढील अधिकारसुद्धा या भाषणाच्या पार्श्वभूमीवर अभ्यासावे लागतात.

बडोदा संस्थानातील स्त्रियांना सयाजीरावांनी कोणत्याही मागणीशिवाय मतदानाचा अधिकार दिला. सयाजीराव हे स्त्रियांना मतदानाचा अधिकार देणारे पहिले राज्यकर्ते ठरतात. त्याचबरोबर लोकल बोर्डस् आणि म्युनिसिपालिटीमध्ये कायदेशीर सदस्यत्व तसेच लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्येही सदस्यत्व देणारे सयाजीराव पहिले शासनकर्ते ठरतात.

## कूचबिहार संस्थानची पार्श्वभूमी

तत्कालीन भूतान संस्थानच्या हद्दीला लागून असणारे कूचबिहार हे आदिवासी संस्थान होते. कूचबिहारचे राजघराणे, मानकरी मंडळी आणि प्रजा हे सर्वजण आदिवासी असले तरी कारकुनापासून दिवाणापर्यंतच्या सर्व अधिकारी पदावर बंगाली व्यक्तींचा वरचष्मा होता. जंगली साधनांवर अवलंबून असणारे या संस्थानातील कोळी लोक अविकसित स्वरूपातील शेती करून आपला उदरनिर्वाह करत. या आदिवासींची सांपत्तिक स्थिती कंगालीच्या सदरात मोडणारी होती. कुचबिहार संस्थानचे उत्पन्न जवळपास कोल्हापूर संस्थानइतकेच असल्याचे निरीक्षण विठ्ठल

रामजी शिंदेंनी नोंदवले आहे. या संस्थानात विद्यार्थ्यांना कला शाखेचे पदव्युत्तर शिक्षण देण्यासाठी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली होती. या महाविद्यालयात ३०० विद्यार्थी मोफत शिक्षण घेत होते.

## इंदिराराजेंचा विवाह : राजर्षी शाहूंच्या धनगर - मराठा विवाहाला नैतिक बळ

महाराष्ट्राला शाहू महाराजांच्या प्रेरणेने शाहू महाराजांच्या जनक घराण्यातील चुलत बहिणीचा इंदूरच्या यशवंतराव होळकरांबरोबर १९२४ मध्ये झालेला मराठा-धनगर हा आंतरजातीय विवाह माहीत आहे. या विवाहासाठी शाहू महाराज १९१८ पासून प्रयत्नशील होते. परंतु १९२२ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत शाहूंना यामध्ये यश मिळाले नाही. या संदर्भात शाहूंचे पहिले चरित्रकार अण्णासाहेब लट्ठे म्हणतात, “इंदूरच्या युवराजांचा महाराजांच्या जन्म घराण्यातील एका मुलीशी विवाह जुळून यावा म्हणून महाराजांनी पुष्कळ प्रयत्न केला; परंतु बहुधा दुसऱ्या एका मराठा जातीच्या महाराजांच्या विरोधकांमुळे, त्या वेळी महाराजांच्या या प्रयत्नास यश आले नाही. मात्र १९२४ च्या फेब्रुवारी महिन्यात महाराजांनी सुचविल्याप्रमाणे हा धनगर-मराठा विवाहसंबंध जुळून आला, हे येथे सांगितले पाहिजे.” परंतु शाहू महाराजांना या आंतरजातीय विवाहाची प्रेरणा देणारा

त्याअगोदर ११ वर्षे म्हणजे १९१३ ला झालेला राजघराण्यातील पहिला मराठा-आदिवासी आंतरजमातीय विवाह महाराष्ट्राला माहीत नाही.

३ फेब्रुवारी १९१८ रोजी बडोद्याचे खासेराव जाधव यांना लिहिलेल्या पत्रात शाहू महाराजांनी डिसेंबर १९१७ मध्ये झालेल्या खामगाव येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अध्यक्षीय भाषणाची चर्चा केली आहे. या भाषणात ‘आपण जातिभेद मोडले पाहिजेत या उद्देशाने आपण आर्य समाजाची म्हणजे वस्तुतः वैदिक धर्माची शाखा स्थापन केली. ढोंगी बोलण्यापेक्षा खरे स्पष्ट बोलणे कधीही श्रेयस्कर आहे. मळमळीत सौभाग्यापेक्षा झळझळीत वैराग्य चांगले.’ अशी भूमिका घेऊन जातिभेद मोडण्यासाठी बेटी व्यवहार करण्याची गरज शाहू महाराज व्यक्त करतात. याच पत्रात पुढे ते आंतरजातीय विवाहाचा सूतोवाच करतात. आपल्या कुटुंबापासूनच या मोहिमेची सुरुवात झाली पाहिजे अशी भूमिकाही मांडताना पुढे ते लिहितात, “म्हणून आपल्या धर्माचा वैदिकपणा कायम ठेवून जातींचा अडथळा कमी करण्याला आर्यसमाज सध्याच्या काळी चांगले साधन आहे असे वाटते. पुराणांतरी देव व राक्षस यांच्यात व उच्च व कनिष्ठ वर्णात विवाह झाल्याचे आधार आहेत. हल्लीच्या काळींसुद्धा क्षत्रिय मराठ्यांचे संबंध शूद्रांशी झालेले आहेत. कुचबिहारशी तर आमचा संबंध झालाच आहे. इंदूरकरांनी तालचेरकराशी संबंध केला आहे. तेव्हा आता

कालाचा बोध पाहून जामनगर, राजाड, इंदूर, कुचबिहार वगैरे हिंदु राजघराण्यांशी "Bloodrelationship" घडून येईल असे करण्यास आम्ही तयार असले पाहिजे."

आंतरजातीय विवाहाचा आपल्या कुटुंबापासून आरंभ करण्याचा मनोदय शाहू महाराज सर्वप्रथम बडोद्याच्या खासेराव जाधवांसमोर व्यक्त करतात. याला १९१३ च्या इंदिराराजेंच्या मराठा-आदिवासी विवाहाचा संदर्भ आहे. खासेरावांना ते मित्र आणि मार्गदर्शक मानत होते. खासेराव सयाजीरावांच्या खास मर्जीतले होते. हे सर्व संदर्भ विचारात घेता ब्राह्मणशाहीचा नांगा जिरवण्यासाठी शाहू महाराज कोल्हापूर-इंदूर या धनगर विवाहाचे जे शस्त्र वापरणार होते त्यासाठीचे सर्वात मोठे नैतिक पाठबळ म्हणून शाहू महाराज बडोद्याकडे पाहत होते असा निष्कर्ष निघतो.

सयाजीराव महाराजांची एकुलती कन्या इंदिराराजे यांनी कूचबिहार या आदिवासी संस्थानातील राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वत:च ठरवून विवाह केला होता. विशेष म्हणजे सयाजीरावांनी ग्वाल्हेरच्या माधवराव शिंदे यांच्याशी त्यांचा विवाह ठरवला होता. असे असतानाही सयाजीराव या विवाहात स्वत:ची प्रतिष्ठा आडवी न येऊ देता खंबीरपणे मुलीच्या पाठीशी उभे राहिले.

सयाजीरावांना पाच अपत्ये होती. त्यामध्ये ज्येष्ठ पुत्र फत्तेसिंहराव, जयसिंहराव, शिवाजीराव, कन्या इंदिराराजे आणि सर्वात लहान धैर्यशीलराव होते. इंदिराराजे या चौथे अपत्य असून

एकुलते एक कन्यारत्न होत्या. त्यांचा जन्म १ मार्च १८९२ ला झाला. इंदिराराजे मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्या होत्या. त्याचबरोबर त्यांना संस्कृतही येत होते. महाराजांबरोबरच्या युरोप-अमेरिकेच्या प्रवासाने त्यांची दृष्टी विशाल झाली होती. त्यांची बुद्धी फार कुशाग्र होती.

एप्रिल १९११ मध्ये ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे यांच्याशी सयाजीरावांची कन्या इंदिराराजे यांचा विवाह ठरविण्यात आला. यानंतर लगेचच महाराज युरोप दौऱ्यास निघून गेले. युरोपहून परत आल्यावर मुहूर्त ठरवून लग्न समारंभ उरकून टाकण्याचे निश्चित करण्यात आले. दिल्ली दरबार संपताच डिसेंबर महिन्यात विवाह करण्याचे ठरले.

१२ सप्टेंबर १९११ ला बादशहा पंचम जॉर्ज यांचा दिल्ली येथे दरबार भरला होता. या दरबारच्या दिवशी वरिष्ठ सत्तेसंबंधीच्या रागाने आणि प्रकृती अस्वास्थ्याने सयाजीराव बेचैन होते. दरबारात व्हॉइसराय लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या स्वागतपर भाषणानंतर बादशहा पंचम जॉर्ज यांना मुजरा करण्याचा कार्यक्रम सुरू झाला. यावेळी सयाजीरावांनी अजाणतेपणे बादशहांना ठरल्याप्रमाणे मुजरा केला नाही तर महाराणींना मुजराच केला नाही. त्यामुळे सयाजीरावांनी बादशहाचा अपमान केल्याचा सयाजीरावांविरुद्धचा अतिशयोक्त मजकूर विविध वृत्तपत्रांतून छापून आला. सयाजीरावांचे हे मुजरा प्रकरण जगभर गाजले.

## इंदिराराजेंचा क्रांतीसंघर्ष

दिल्ली दरबारच्या घटनेनंतर थोड्याच दिवसांनी माधवरावांनी लंडनमध्ये सरदेसाईंची भेट घेतली. या भेटीत माधवरावांनी सरदेसाईंशी दिल्ली दरबारच्या घटनेसंदर्भात चर्चा केली. सयाजीराव महाराजांनी ब्रिटिश सरकारशी वाद घालून त्यांचा रोष ओढवून घेतला आहे. महाराजा सयाजीराव आणि बादशहा पंचम जॉर्ज यांच्यातील हा रोष काढून टाकून त्यांच्यात मैत्री घडवून आणण्याचा आपला हेतू असल्याचे माधवरावांनी सरदेसाईंना सांगितले. माधवरावांचा हा हेतू साध्य झाला तरच ते सयाजीरावांचे जावई होण्यास तयार होते. सयाजीराव राजद्रोही ठरले तर त्यांच्या कन्येशी विवाह करण्याची माधवरावांच्या मनाची तयारी नव्हती.

आपले ठरलेले लग्न मोडू नये अशी माधवरावांची तीव्र इच्छा होती. त्यावेळी इंदिराराजे १९ वर्षांच्या तर माधवराव ४० वर्षांचे होते. या दोघांच्या वयात २१ वर्षांचे अंतर होते, शिवाय त्यांची पहिली पत्नी जिवंत होती. माधवराव शिंदे अत्यंत सनातनी वृत्तीचे होते. दिल्ली दरबारच्या वेळी माधवराव शिंदे व इंदिराराजे यांच्यात वारंवार भेटी होऊ लागल्या. या भेटीदरम्यान इंदिराराजे आणि माधवराव यांच्यात काही कारणाने वाद उत्पन्न झाला.

माधवराव शिंदे म्हणत, "मला मूल नाहीं म्हणून पहिली बायको जिवंत असता दुसरी करणार." यावर इंदिराराजे म्हणत, "नवऱ्याचे प्रेम नसेल तर मला केवळ पुत्रवती म्हणवून घेण्याची हौस नाही." असा दोघांमध्ये वाद झाला. इंदिराराजेंना फक्त मुलासाठी विवाह करून माधवरावांची दुसरी पत्नी म्हणून दुय्यम दर्जा नको होता. एकंदरीत या विवाहापासून त्या आनंदी नव्हत्या. सयाजीराव आपल्या प्रशासकीय कामकाजात व्यस्त असल्यामुळे या दोघांमध्ये नेमके काय चालू आहे याची त्यांना जराही कल्पना नव्हती.

दिल्ली दरबार संपताच सर्व मंडळी बडोद्यास परत आली. राजपुत्र विद्यालय सुरू असल्याने केवळ इंदिराराजे व त्यांच्या मैत्रिणींना शिकविण्याचे काम सरदेसाईंना होते. इंदिराराजेंचे लग्न होऊन त्या ग्वाल्हेरला जातील आणि सरदेसाईंना दुसरे काम दिले जाईल असा तो काळ होता. परंतु परत येताच महाराजांनी सरदेसाईंना एक मुख्य काम दिले. ते म्हणजे लग्न होईपर्यंत इंदिराराजेंना सतत अभ्यासात गुंतवून ठेवण्याचे. त्या काळात सरदेसाई वर्षभर इंदिराराजेंचे शिक्षक म्हणून होते. महाराजांच्या सूचनेवरून इंदिराराजे यांचे मन कामात गुंतवून ठेवण्यासाठी सरदेसाई कालिदासाचे शाकुंतल नाटक राजकन्या व त्यांच्या मैत्रिणींना शिकवू लागले. रोज दोन तास वाचून दोन-चार महिन्यांत ते पुस्तक चिकित्सेने वाचून संपविले.

कालिदासाच्या या नाटकाचा विषय प्रेमविवाहाचा होता आणि त्यावेळी इंदिराराजेंची मनःस्थिती तशीच असल्यामुळे त्यात त्यांचे मन विशेष रमले होते. वाचनाच्या ओघात त्या सरदेसाईंना आपल्या मनाची करुण स्थिती सांगत असत. ते ऐकून सरदेसाईंनाही वाईट वाटे. प्रेमाशिवाय पाशवी विवाह काय कामाचा यावरच अधिक चर्चा होत असे.

या चर्चेनंतर सरदेसाई इंदिराराजेंना विचारत असत, "तुम्ही माझ्याशी जसे मनमोकळेपणीं बोलता तसे ते सर्व तुम्ही आपण होऊन आईबापांशी का नाही बोलत? तेच तुमचे मुख्य कळकळीचे हितकर्ते. ते काही तरी तोड काढतील. मी कसा झालो तरी त्यांचा आज्ञाधारक सेवक." आपल्या आई-वडिलांजवळ आपले मन मोकळे करण्याचे सरदेसाईंनी सुचविले, पण त्यावर इंदिराराजे म्हणत, "आईबापांना माझे बोलणे ऐकून घेण्याइतकी स्वस्थता आहे कुठे? जरा तोंड उघडले की मजवर खेकसून गप्प बसवितात. सर्व बोलणेच खुंटते. माझा अगदी सर्व तऱ्हेने नाइलाज झालेला आहे. माझा जीव अगदी नकोसा झाला आहे."

इंदिराराजेंच्या विवाहासंदर्भातील चर्चा चालू असताना सयाजीरावांनी त्यांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ दिले नाही. याच दरम्यान सयाजीरावांनी इंदिराराजेंना उच्च शिक्षण देण्याच्या उद्देशाने त्यांचा बडोदा कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. महाराजांच्या या कृतीवर कर्मठ समाजाबरोबरच जवळच्या नातेवाईकांनीदेखील टीका केली. या संदर्भात ४ जानेवारी १९१० रोजी बडोद्यातून

श्री. पवारांना पाठवलेल्या पत्रात सयाजीराव लिहितात, “इंदिरा राजेंनी बडोदा कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आहे. ही गोष्ट आपल्या काही लोकांना आणि नातेवाईकांना फारशी आवडलेली नाही, आवडणारी नाही. नवीन सुधारणांबद्दल नेहमीच संशय घेतला जातो.” परंतु सयाजीराव आपल्या निर्णयावर ठाम राहिले. इंदिराराजेंनी सर्वसामान्य मुलींबरोबर बडोद्यात कॉलेजमध्ये उच्च शिक्षण घेतले. विशेष बाब म्हणजे राजघराण्यातील व्यक्ती म्हणून इंदिराराजेंना बडोदा कॉलेजमध्ये कोणत्याही प्रकारची विशेष वागणूक दिली जात नव्हती. एका बाजूला बादशहा पंचम जॉर्ज यांच्या अपमानाचे प्रकरण महाराजांच्या मनात घोळत होते तर दुसरीकडे महाराणींच्या मनात इंदिराराजेंच्या विवाहाचा विषय सतत चालू होता. बादशहांच्या अपमानाचे हे प्रकरण सयाजीराव आणि चिमणाबाई दोघे मिळून सरदेसाईंकडून लिहून घेत असत. परंतु इंदिराराजेंच्या या विचाराबद्दलची माहिती महाराजांना नव्हती.

## रियासतकार सरदेसाईंची यशस्वी मध्यस्थी

सरदेसाईंनी चिमणाबाईंना भेटून इंदिराराजेंच्या विवाहासंदर्भातील आपले विचार बोलून दाखविले आणि त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु चिमणाबाई म्हणाल्या, “वचन गेले आहे तर मुलीने शिंदे महाराजांशींच विवाह केला पाहिजे. दुसरा मार्ग नाही.” यावर सरदेसाई अगदी स्पष्टपणे

म्हणाले, “लग्नासारख्या बाबतीत आईबापांचा आग्रह काय कामाचा! आपण चार मुलांच्या माता, अनुभवी आहा, मी आपणास शिकवावेसे नाही. पण मला एक समजते की, सहा महिन्यांचे मूलदेखील आपल्या आईला औषध पाजू देत नाही, मग ही आपली कन्या इंदिरा सुशिक्षित असता आपले म्हणणे खरे केल्याशिवाय कशी राहील? तिच्यावर नजर ठेवा, कदाचित् जिवास एखादा अपघात करून घेईल.” सरदेसाईंच्या या बोलण्याचा चिमणाबाईंवर अपेक्षित परिणाम होऊन हळू-हळू त्यांनी आपला आग्रह सोडून दिला. लेडी टोटनहॅम या चिमणाबाईंच्या शिक्षिका होत्या. त्यांनीही याबाबत महाराणी चिमणाबाईंना समजावण्याचा प्रयत्न केला. मुले मोठी झाली आहेत, थोडे त्यांच्या कलाने घ्यावे अशी विनंती त्यांनी महाराणींना केली होती.

सरदेसाईंचा चिमणाबाईंचे मन वळवण्याचा हा प्रयत्न काही प्रमाणात यशस्वी झाला. परंतु सयाजीरावांसमोर हे प्रकरण कोण मांडणार? असा प्रश्न सरदेसाई व इंदिराराजेंना पडला. प्रत्यक्ष सयाजीरावांना इंदिराराजे काही सांगण्यास गेल्या तर ते त्यांना गप्प बसवत. त्यामुळे इंदिराराजे सयाजीरावांना काहीच सांगू शकत नव्हत्या. मुलांनी आपल्या मनातील विचार आई-वडिलांना नाही सांगायचे तर कोणाला सांगायचे. पण महाराजांचा स्वभावच असा झाला होता की, कोणाचेही काम अगोदर ठरविल्याशिवाय कोणीही वाटेल तेव्हा भेटून अचानकपणे आपले म्हणणे सांगू

नये. सयाजीरावांकडे कोणाचेही काम असल्यास त्याला त्या कामाची माहिती अगोदरच द्यावी लागत असे. आपली मुले, सुना किंवा कोणीही नातेवाईक भोजनास वगैरे येऊन त्यावेळी आपले म्हणणे महाराजांना सांगत असे. हा भोंगळ कारभार सयाजीरावांनी बंद केला.

मुलांनासुद्धा वडिलांशी अचानकपणे वाटेल ते बोलण्यास मनाई होती. त्यांना जर महाराजांशी बोलायचे असेल तर त्यांनीही सेक्रेटरी व ए.डी.सी. यांच्यामार्फत महाराजांना अगोदर सूचना द्यावी असा नियम होता. एखादा विषय अचानकपणे समोर आल्याने त्यावर योग्य उपाय निघणार नाही. जर आपल्याला एखाद्या विषयाची माहिती असेल तर त्यावर अगोदरच आपण काहीतरी योजना ठरवू शकतो. असा हा नियम करण्यामागे सयाजीरावांचा हेतू होता. व्यावहारिकदृष्ट्या हा नियम कितीही योग्य असला तरी कुटुंबातील व्यक्तींना तो न पटणाराच होता. सरदेसाईंनी अनेक वेळा हा अनिष्ट प्रकार महाराजांना स्पष्टपणे बोलून दाखविला, “तुमच्या मुलांना खरे आईबाप नाहीत. तुमच्याकडे येऊन त्यांना रडण्याचाही हक्क नाही. हा प्रकार निसर्गविरोधी होय.” पण यावर महाराज म्हणत, “अहो रावसाहेब, मला व्यवहारासाठी असे वागणे भाग पडते. माझ्या मुलांप्रमाणेच प्रजेकडेही मला लक्ष द्यावे लागते.”

## सयाजीरावांचा समजूतदारपणा

अशा परिस्थितीत सरदेसाईंनी इंदिराराजेंना एक युक्ती सुचवली. या संदर्भातील हकिकत रियासतकार सरदेसाईंनी 'श्री. सयाजीराव गायकवाड यांच्या सहवासांत' या पुस्तकात सविस्तरपणे दिली आहे. सरदेसाई लिहितात, "त्यावर मी त्यांना एक युक्ती सुचवली. मी म्हटले, "तुम्ही वडिलांना खुलासेवार एक पत्र लिहा." त्या म्हणाल्या, "पत्र त्यांना पोचणार नाही आणि पोचले तरी ते वाचणार नाहीत." मी सांगितले, 'ती जबाबदारी मी घेतो. पत्र त्यांच्या हाती पडावे आणि ते त्यांनी स्वतः वाचावे ही तजवीज मजकडे लागली.' आदल्याच दिवशी महाराज कडीपट्टणला गेले असून तिकडे त्यांचा मुक्काम आठ-चार दिवस व्हायचा होता. मी जवळ बसून इंदिराकडून सयाजीरावांना पत्र लिहविले. मीच तिकीट लावून ते टपालात टाकले आणि महाराजांबरोबर स्वारीत सेक्रेटरी होते त्यास मी स्वत: पत्र लिहून कळविले, आजच्या टपालाने श्री. इंदिरा राजे यांनी महाराजांना स्वतः पत्र लिहिले आहे हे त्यासच खुद्द पोचेल असे करावे."

सरदेसाईंची कल्पना यशस्वी झाली. ठरल्याप्रमाणे इंदिराराजेंचे पत्र महाराजांना मिळाले. सयाजीरावांनी ते पत्र लक्षपूर्वक वाचून लगेच स्वहस्ताने उत्तर लिहून इंदिरांना पाठविले. महाराजांचे इंदिरांच्या पत्राला पाठविलेले उत्तर अत्यंत प्रेमळ होते. त्यांनी मुलीचे समाधान जिव्हाळ्याने केले. सयाजीराव लिहितात, "तुझ्या इच्छेविरुद्ध मी काही करणार नाही, तुझे कल्याण होईल

तितके करावे हीच माझीही उत्कंठा आहे. लग्नाच्या बाबतींत तुला आपला वर पसंत करण्याची पूर्ण परवानगी आहे. शिंदे पसंत नसतील तर मी आग्रह करणार नाही. तू ठरविशील ते मी मान्य करीन.” सयाजीरावांचे हे उत्तर वाचून इंदिराराजेंना खूप आनंद झाला.

## इंदिराराजेंचे 'निर्णायक' पत्र

याच दरम्यान केवळ मूल नसल्यामुळे दुसरा विवाह करू इच्छिणाऱ्या माधवराव शिंदेशी होणारा विवाह आपल्याला मान्य नसल्याचे इंदिराराजेंनी स्वतः पत्राद्वारे शिंदेंना कळवले. या पत्रात इंदिराराजे लिहितात, “रा. रा. माधवराव शिंदे, महाराज ग्वाल्हेर यांशी इंदिरा राजेचा स. न. माझे हे पत्र पाहून आपणास धक्का बसेल. पण वेळीच निर्णय घेणे आवश्यक असल्याने आपल्या दोघांच्याही पुढील आयुष्यासाठी चांगले म्हणून मी हा अवघड गुंता वेळीच सोडविण्यासाठी धाडस करीत आहे, त्याबद्दल आपण मला क्षमा करावी. आपल्या काही भेटी झाल्या, बोलणे झाले, त्यातून तुम्ही म्हणाला, “तुम्हाला मूल नाही म्हणून पहिली बायको जिवंत असताना माझ्याशी विवाह करत आहात.” माझे मत असे आहे नवऱ्याचे प्रेम नसेल तर मला केवळ पुत्रवती म्हणवून घेण्याची हौस नाही. आयुष्यभर आपली राणी बनून पडद्याआड राहण्याची कल्पनाही मी करू शकत नाही. आमचे पिताश्री श्रीमंत सयाजीराव महाराजांनी बडोदा संस्थानात

द्विभार्या प्रतिबंधक कायदा करविला आहे. माझ्या या विवाहाने हा कायदाही मोडला जाणार आहे. या सगळ्या कारणांचा विचार करून मी शांतपणे निर्णय घेतला की, या विवाहास माझी तयारी नाही. हे पत्र मी पूर्ण विचारांती लिहीत आहे. आपणास झालेल्या त्रासाबद्दल क्षमा करावी.”

१९०८ पासून सयाजीरावांची नात इंदुमतीदेवी आणि शाहू महाराजांचे सुपुत्र राजाराम यांच्या विवाहासंदर्भातील पत्रव्यवहार सयाजीराव आणि शाहू यांच्यामध्ये सुरू झाला. २९ मार्च १९११ ला शाहूंना लिहिलेल्या पत्रात ‘इंदुमतीदेवींचे वय बडोद्याच्या बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार १२ वर्षे नसल्यामुळे त्या १२ वर्षाच्या होईपर्यंत विवाह करता येणार नाही’ अशी भूमिका सयाजीराव घेतात. यानंतर १ वर्षाने इंदिराराजे माधवराव शिंदेंना ‘तुमचा हा दुसरा विवाह असल्यामुळे तुमच्याशी विवाह केल्यास तो बडोदा संस्थानच्या द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा भंग होईल’ अशी भूमिका घेतात. या दोन्ही पत्रांचा विचार करता मुलगी वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकून जात होती असेच म्हणावे लागेल. तर सयाजीरावांच्या उक्ती आणि कृतीतील एकवाक्यतेच्या पार्श्वभूमीवर बडोद्याच्या द्विभार्या प्रतिबंधक कायद्याचा भंग करणारा निर्णय सयाजीरावांनी नेमका का घेतला यावर अधिक संदर्भ शोधून संशोधन करावे लागेल.

## इंदिराराजेंची ‘स्वतंत्र’ निर्णयक्षमता

पुढे वर्षभरात इंदिराराजेंनी कूचबिहारच्या महाराजांचे बंधू राजकुमार जितेंद्र नारायण यांच्याशी स्वतःच विवाह जुळविला. सयाजीराव इंदिराराजेंसह स्वित्झर्लंडला गेले. तेथून त्यांनी इंदिरांना चिमणाबाईंच्या सेक्रेटरी कु. टॉटेनहॅम आणि कॅप्टन परब यांच्याबरोबर लंडनला पाठविले. विवाहाच्या सर्व कायदेशीर बाबींची पूर्तता करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. तर इंदिराराजेंच्या ताब्यात असलेल्या दागिन्यांची यादी खजिनदारांकडे सोपवण्यात आली. २५ ऑगस्ट १९१३ रोजी लंडनमध्ये इंदिराराजेंचा विवाह ब्राह्मो समाजाच्या रीतीप्रमाणे झाला. महाराज व महाराणी मात्र या विवाहास हजर नव्हते. १९११ ते १९१३ अशी तीन वर्षे इंदिराराजेंचा हा विवाह सयाजीरावांना अस्वस्थ करत होता. त्यामुळे त्यांना खूप मानसिक त्रास झाला.

कूचबिहारचे राजघराणे ब्राह्मोसमाज पंथाचे असून बंगालमधील समाज सुधारकांमध्ये अग्रगण्य समजले जात होते. तेथील राजमाता सुनीतीदेवी या ब्राह्मोसमाजाचे प्रसिद्ध पुढारी केशवचंद्र सेन यांच्या कन्या होत्या. इंदिराराजे यांचा विवाह झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी तेथील राजपदावर असलेले महाराज दिवंगत झाले. त्यामुळे त्यांचे लहान भाऊ जितेंद्र नारायण यांना राजपद मिळाले व इंदिराराजे ओघानेच कूचबिहारच्या महाराणी झाल्या. परंतु महाराणी चिमणाबाईंनी

आपल्या एकुलत्या एक कन्येच्या विवाहाच्या बाबतीत इतका राग मनात धरला की इंदिराराजेंशी आपले संबंध तोडून टाकले. विवाहाच्या सहा-सात वर्षांनंतर इंदिराराजे आजारी असताना सयाजीराव महाराज स्वतः कलकत्त्यास इंदिराराजेंना भेटायला गेले व त्यांना बरे वाटल्यावर बडोद्यास सन्मानाने घेऊन आले.

## कन्या गायत्रीदेवींचे आत्मकथन

या विवाहासंदर्भात इंदिराराजेंच्या कन्या गायत्रीदेवी यांनी 'अ प्रिन्सेस रिमेंबर्स' या त्यांच्या आत्मकथनात नोंदवलेल्या आठवणी महत्त्वपूर्ण आणि मनोरंजक आहेत. गायत्रीदेवी लिहितात, "कूचबिहारच्या राजपुत्राशी लग्न करू द्यावं ही आईची इच्छा मात्र सहज पूर्ण झाली नाही. तिला तीव्र विरोध झाला. कूचबिहार बडोद्यापेक्षा कमी महत्त्वाचं आणि लहान संस्थान होतं, ते राजघराणं वेगळ्या जातीचं होतं, उच्च मराठा कूळ नव्हतं, राजपुत्र धाकटा मुलगा असल्याने पुढे गादीवर येण्याची शक्यता नव्हती हे सगळे मुद्दे असले तरी आजोबांच्या दृष्टीने ते कमी महत्त्वाचं होते. आजोबांना सगळ्यात जास्त खटकलं ते त्या संस्थानाचं पाश्चिमात्त्य वळण. त्याला मात्र त्यांचा पूर्ण विरोध होता. कूचबिहारचे संस्थानिक एडवर्डियन समाजात मिसळत होते. परदेशी पाहुण्यांची त्यांच्याकडे सतत वर्दळ होती, कोणत्याही स्तरातल्या लोकांची सरबराई केली जात होती हे आजोबांना मुळीच पटत नव्हतं. त्यांच्या परंपराप्रिय विचारांना असं मुक्त वागणं मानवण्यासारखं नव्हतं.

हा मोह सोडावा म्हणून आईवर सर्व तऱ्हेचे दबाव आणले गेले. तिने राजपुत्राला भेटण्यावर, त्याच्याशी संपर्क ठेवण्यावर बंदी आणली गेली. तिच्या हालचालींवर लक्ष ठेवता येईल अशा खुबीने दासींची, पाठराखणींची संख्या नेहमीपेक्षा वाढवण्यात आली. पण शेवटी तिच्यातही माझ्या आजीचा स्वतंत्र बाणा आणि कणखर वृत्ती उतरली होतीच, शिवाय ती प्रेमात पडली होती. सगळे पहारे चुकवून तिचा राजपुत्राशी दोन वर्ष व्यवस्थित पत्रव्यवहार चालू होता. एवढंच नाही तर उन्हाळ्यात आजी-आजोबांबरोबर लंडनला गेलं की तिथे तिच्या आणि त्याच्या चोरून भेटी व्हायच्या. कारण तो तिच्या मागोमाग आलेलाच असायचा. १९६८ साली, आईच्या मृत्यूनंतर मी तिची काही कागदपत्रं चाळत होते. त्यात मला त्यावेळची पत्रं सापडली. वडिलांची पत्रं निरनिराळ्या टोपणनावांनी आलेली होती. मिसेस मिली ब्रूक किंवा सिल्विया वर्कमन वगैरे. पत्रांमध्ये कूचबिहारच्या मोह पाडणाऱ्या जीवनाचं वर्णन असायचं किंवा कलकत्त्यातले हिवाळ्यातले उत्सव, दार्जिलिंगमधला वसंत ऋतू, बॉल नृत्य, फॅन्सी ड्रेसपार्टी, पोलो स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा,नृत्य, शिकार इत्यादींची वर्णनं.

तथापि कोंडी फुटण्याची काही चिन्हं दिसत नव्हती. कूचबिहारच्या राजपुत्राशीच लग्न करण्याचा आईचा निश्चय ठाम होता; तर आजी-आजोबा त्यांचा विरोध सोडायला तयार नव्हते. अखेर, १९१३ च्या उन्हाळ्यात आजी-आजोबा इंग्लंडला

निघाले असता त्यांचा मुक्काम मुंबईत होता. आईही अर्थात त्यांच्याबरोबर होती. कूचबिहारच्या राजपुत्राला ताबडतोब बोलावणं गेलं. तिथल्या राजवाड्याच्या ग्रेट दरबार हॉलमध्ये अत्यंत औपचारिक पद्धतीने त्याचं स्वागत झालं. आजोबांच्या डाव्या बाजूला त्यांचे प्रधान तर उजव्या बाजूला मुंबईचे ब्रिटिश रेसिडेंट बसले होते. आजी वरच्या गॅलरीत पडद्याच्या आड बसून सारं पाहत होती. त्यावेळी राजपुत्राला अतिशय कडक शब्दात बजावण्यात आलं की, कोणत्याही परिस्थितीत त्याला आईशी लग्न करता येणार नाही. त्याने ही गोष्ट डोक्यातून कायमची काढून टाकावी. या बैठकीनंतर, आता कोणतीही आशा उरलेली नाही अशा भावनेने राजपुत्राने मुंबई सोडली.

पण खरं सांगायचं तर माझ्या आजी-आजोबांचा विरोध आता संपुष्टात यायला लागला होता. मुंबईतली त्यांची बैठक, त्यांची अखेरची भूमिका स्पष्ट करणारी होती. ते इंग्लंडमध्ये आले. कदाचित माझ्या आईच्या हट्टी प्रतिकारामुळे असेल, अफवांमुळे किंवा अंत:प्रेरणेने असेल, आईचा पळून जायचा बेत आहे असं आजी-आजोबांना जाणवलं. त्यामुळे हताश होऊन, विरोध मागे घ्यायचं त्यांनी ठरवलं. कारण आई खरंच पळून गेली असती तर ते एक मोठंच बदनामीकारक प्रकरण झालं असतं. त्यांनी लग्नाला परवानगी तर दिली, पण लग्नाच्या तयारीत कोणताही सहभाग घ्यायला नकार दिला.

लग्न करण्यासाठी आईला आजोबांचे मित्र सर मिर्झा अली बेग यांच्याकडे लंडनला पाठवण्यात आलं. त्यांच्या किशोरवयीन मुलांवर या घटनेचा काय परिणाम झाला त्याचं वर्णन रशीद अली बेग या एका मुलाने लिहून ठेवलं आहे.

'या घटनेने जी खळबळ माजली ती मला चांगली आठवते. इंग्लंडमध्ये भारतीय लोक फार थोडे होते. त्यामुळे साडी या प्रकाराने लोकांचं लक्ष वेधून घेतलं. इंदिरादेवींच्या सौंदर्याने लोकांना खिळवूनच ठेवलं. त्यांच्या सौंदर्याचं वर्णन 'अद्भुत' या शब्दाने करणं म्हणजे वापरून गुळगुळीत झालेला शब्दच पुन्हा वापरणं. आमच्या घरी वार्ताहरांनी गर्दी केली. त्यांची असंख्य छायाचित्रं घेतली गेली. आम्ही लहान मुलं त्या परावर्तित झगमगाटात, त्या वैभवात आनंदाने वावरलो. ते लग्न ही त्या मोसमातली मोठी बातमी होती. वृत्तपत्रांनी छायाचित्रांसह पूर्ण पान या घटनेला दिलं होतं. सगळ्या वृत्तपत्रांच्या कात्रणांची आम्ही फाइल केली. बराच काळ आम्ही त्या फायली पुन:पुन्हा बघून स्मरणरंजन केलं.

अखेर १९१३ च्या जुलै महिन्यात माझे आई-वडील लंडनमध्ये विवाहबद्ध झाले. माझ्या आजीची इंग्लिश सहचरी मिस टॉटेनहॅम आणि एक वकील अशा दोघांनी पालकांची भूमिका पार पाडली. आजीने नवविवाहित जोडप्याला शुभेच्छेची तार पाठवली. उभयतांचं आयुष्य सुखी व्हावं अशी इच्छा व्यक्त

केली; पण आजोबांकडून एक शब्दही गेला नाही. आजोबांनी जावयाला फक्त एवढीच अट घातली की लेकीला व्यक्तिगत खर्चापोटी एक लाख रुपये त्यांच्याकडून मिळावेत.

माझ्या आईने डोळ्यांत पाणी आणून केलेली अखेरची क्षमायाचनाही व्यर्थ ठरली. तिने आजीचे आशीर्वाद मागितले, पण प्रतिसाद मिळाला नाही. पण मिस टॉटेनहॅमने सांगितलं की, आई खोलीतून बाहेर पडल्याबरोबर आजी धाय मोकलून रडायला लागली. तथापि तिने पुढची दोन वर्ष आईशी कोणताही संपर्क ठेवला नाही. १९१४ मध्ये माझ्या मोठ्या बहिणीचा इलाचा जन्म झाला तेव्हा आई खूप आजारी पडली. तेव्हा कुठे आजीचा राग निवळला आणि तिने पुन्हा आईशी संबंध प्रस्थापित केले. पण ते करण्याची तिची पद्धतही विशेष होती. आपल्या लेकीला खास बडोद्याचे पदार्थ खायला मिळावेत म्हणून तिने कूचबिहारला एक मराठा आचारी पाठवला.

माझ्या आई-वडिलांचं लग्न झालं, त्याच सुमाराला कूचबिहारच्या घराण्यातल्या एका प्रेमप्रकरणाचा दुःखद शेवट झाला. माझ्या वडिलांचे मोठे भाऊ म्हणजे माझे काका कूचबिहारचे महाराजा राजा राजेंद्रनारायण हे एडना मे नावाच्या इंग्लिश नटीच्या प्रेमात पडले होते. पण त्यांच्या कुटुंबाने या लग्नाला विरोध केला. दोन वर्षापूर्वी त्यांनी कुटुंबीयांना सांगितलं की, असाच विरोध कायम राहिला तर मी विष पिऊन आत्महत्या करीन. १९१३ मध्ये ते खरोखरच फार आजारी पडले.

माझ्या आईवडिलांच्या लग्नानंतर तीन आठवड्यांनी ते वारले. उरलेल्या तीन भावांपैकी मोठे म्हणून माझे वडील कूचबिहारचे महाराजा झाले.”

इंदिराराजेंची कन्या गायत्रीदेवींनी आपल्या आत्मकथनात आपल्या आईंच्या क्रांतिकारक विवाहाची हकिकत वरीलप्रमाणे वस्तुनिष्ठपणे मांडली आहे.

१९१४ मध्ये गायत्रीदेवींच्या मोठ्या बहिणीच्या जन्मावेळी आजारी पडलेल्या इंदिराराजेंशी महाराणी चिमणाबाईंनी पुन्हा एकदा संबंध प्रस्थापित केले. तर १९१८ मध्ये पुण्यात गायत्रीदेवींचा दुसऱ्या क्रमांकाचा भाऊ इंद्रजितेंद्रनारायण यांचा जन्म झाला. यादरम्यान पुण्यात भरणाऱ्या घोड्यांच्या शर्यतीला सयाजीराव महाराज आणि महाराणी चिमणाबाई उपस्थित होते. या पुणे मुक्कामामध्येच इंदिराराजे आणि त्यांचे आई-वडील यांच्यामध्ये पूर्ण समेट झाल्याचे गायत्रीदेवींनी नोंदवले आहे.

गायत्रीदेवींनी स्वतःच्या टोपणनावाची ‘गोष्ट’देखील सांगितली आहे. गायत्रीदेवींच्या वेळी गर्भवती असताना इंदिराराजे रायडर हॅगार्ड या परदेशी लेखकाची ‘She’ ही इंग्रजी कादंबरी वाचत होत्या. ही कादंबरी वाचत असतानाच आपल्याला मुलगी झाल्यास तिचे नाव आयेशा ठेवण्याचे इंदिराराजेंनी निश्चित केले होते. आयेशा हे त्या कादंबरीच्या नायिकेचे नाव होते. परंतु परंपरेनुसार मुलीच्या जन्मानंतर शकुनाचे अक्षर ‘ग’ आल्यामुळे मुलीचे नाव गायत्री ठेवण्यात

आले. परंतु इंदिराराजे गायत्रीदेवींना आयेशा या नावानेच हाक मारत असत. गायत्रीदेवींच्या जन्मानंतर काही दिवसांनी घरी आलेल्या इंदिराराजेंच्या मुस्लिम मैत्रिणींनी आयेशा हे टोपणनाव ऐकले. तेव्हा त्या मैत्रिणींना धक्का बसला. या मुस्लिम मैत्रिणींनी आयेशा नावाचा खरा इतिहास इंदिराराजेंना सांगितला. त्यांनी सांगितल्यानुसार, आयेशा हे महंमद पैगंबरांच्या नवव्या आणि त्यांच्या सगळ्यात आवडत्या पत्नीचे नाव होते. तोपर्यंत गायत्रीदेवींच्या या टोपणनावाची सर्वांना सवय झाली होती. त्यामुळे गायत्रीदेवींचे हेच टोपणनाव रूढ झाले. मैत्रिणी आपल्याला याच नावाने हाक मारत असल्याचे गायत्रीदेवी आपल्या आत्मकथनात सांगतात.

## इंदिराराजेंचा सुधारणावाद

इंदिराराजेंच्या मातोश्री चिमणाबाई यांनी १९१० पासून सार्वजनिक जीवनात पडदा पद्धतीचा त्याग केला. आई-वडिलांचा सुधारणावाद मुलगीनेसुद्धा पुढे नेल्याचा दाखला इंदिराराजेंच्या १९१३ मधील पुढील कृतीवरून स्पष्ट होतो.

इंदिराराजेंच्या कन्या गायत्रीदेवी यांनी आपल्या आजी सुनीतीदेवी आणि आई इंदिराराजे यांच्यातील मूलभूत फरक आपल्या आत्मचरित्रात स्पष्ट केला आहे. गायत्रीदेवींच्या आजी सुनीतीदेवी या ब्राह्मोसमाजाचे प्रसिद्ध नेते केशवचंद्र सेन

यांच्या कन्या होत्या. सुनीतीदेवींनी आपल्या संस्थानाबाहेरच्या बंगालमधील स्त्रियांच्या उन्नतीसाठी भरपूर कार्य केले. परंतु कूचबिहारमधील पडदा पद्धती नष्ट करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नसल्याचे स्पष्ट मत गायत्रीदेवींनी नोंदवले आहे. सुनीतीदेवी संस्थानाबाहेर कलकत्ता आणि भारतातील इतर भागात भरपूर फिरल्या.

परंतु आपल्या संस्थानात मात्र त्यांनी 'पडद्यात' राहणेच अधिक पसंत केले. त्यांच्या बरोबरच्या इतर स्त्रियांनी राजवाड्याचा दर्शनी भागसुद्धा पाहिला नाही. अशा परिस्थितीत इंदिराराजेंच्या विवाहानंतर त्या उघड्या गाडीतून कूचबिहारला गेल्या तेव्हाच या संस्थानातील पडदा पद्धत नष्ट झाल्याचे गायत्रीदेवी सांगतात. सयाजीरावांनी बडोद्यात स्त्री उन्नतीसाठी राबवलेल्या धोरणाच्या इंदिराराजे स्वतः 'साक्षीदार' आणि 'लाभार्थी' होत्या. इंदिराराजेंच्या माध्यमातून कूचबिहारमध्ये झालेल्या सुधारणा म्हणजे सयाजीरावांनी आयुष्यभर स्त्रीमुक्तीसाठी केलेल्या प्रयत्नांचा 'परिपाक' होता.

इंदिराराजेंनी आई-वडिलांनी ठरवलेला विवाह मोडून स्वतः ठरवून केलेला मराठा-आदिवासी विवाह भारताच्या स्त्रीमुक्ती चळवळीच्या इतिहासात 'मैला'चा क्रांतिकारक दगड ठरतो. कारण इंदिराराजेंनी आपल्या निर्णयावर ठाम राहून केलेला हा विवाह सामान्य नव्हता. कारण सयाजीरावांसारख्या अत्यंत प्रागतिक, प्रतिष्ठित आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तीची कन्या

असणे हे या विवाहातील प्रमुख आव्हान होते. तर ज्या माधवराव शिंदेंशी त्यांचा विवाह ठरला होता ते ग्वाल्हेर संस्थानही तितकेच प्रतिष्ठित होते.

महत्त्वाचे म्हणजे आई-वडिलांनी विवाह ठरवून साखरपुडासुद्धा झाला होता. यामध्ये दोन्हीही संस्थानांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. सयाजीरावांची एकुलती कन्या म्हणूनसुद्धा प्रचंड मोठा भावनिक दबाव या विवाहावर होता. विशेष म्हणजे कूचबिहार हे राजघराणे असले तरी ते आदिवासी राजघराणे होते. परिणामी भारतीय राजघराण्यांच्या परंपरेला आव्हान देण्याचे काम इंदिराराजेंकडून झाले होते. या विवाहाला आई-वडिलांचा स्पष्ट विरोध असतानाही ३ वर्षे संघर्ष करून एक राजकन्या आपला बंडखोर निर्णय तडीस नेते ही बाब खचितच कौतुकास पात्र ठरते.

सयाजीरावांसारख्या प्रतिष्ठित पित्याला त्याचा शब्द माघारी घेऊन मुलगीच्या निर्णयाबरोबर जाणे किती आव्हानात्मक ठरले असेल याची कल्पना वरील तपशिलांवरून सहज येईल. एकूणच सगळ्यांच्याच भूमिकेचा कस तपासणारा हा विवाह भारतीय समाज परिवर्तनाच्या इतिहासात अज्ञात राहतो ही बाब अस्वस्थ करणारी आहे. महत्त्वाचे म्हणजे सयाजीरावांच्या सर्वच कामाचे हजारो संदर्भ बडोद्यात व्यवस्थित उपलब्ध असताना आपल्या संशोधन परंपरेने या सगळ्याबाबत इतकी अनास्था का बाळगली असेल याचे उत्तर प्रयत्न करूनही मिळत नाही. मानवी

**समाजजीवनाच्या सर्वच क्षेत्रात आधुनिक भारतात सर्वोत्कृष्ट काम ज्या महापुरुषाने केले तो महापुरुष 'अनवधानाने' बाजूला राहिला असे म्हणणे दांभिकतेचे ठरेल.**

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूसकर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

❒ **महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे**

**<u>मराठी :</u>**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**<u>English</u>**

- Spechess & Adresses : 2 Books
- Letters : 4 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- Administration : 1 Books
- World Tour Reports : 3 Books
- Education Reforms : 3 Books
- Biographies : 5 Books
- Total English Books : 20

**<u>हिन्दी :</u>**

- सयाजीराव का लेखन : १
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- सयाजीराव जीवनी : २
- भाषण संग्रह : २
- पत्र संग्रह : ३
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद

कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि., ११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com